# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ / फाल्गुन २०, १९४६ (शके)**

**संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्रमांक - ०२ गुरुवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५**

२९. सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरीता सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना संदर्भाधीन पत्रक भाग दोन अन्वये शुक्रवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ रोजीपासून कार्यालयीन वेळेत QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येत आहेत.

तथापि, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार गुरुवार, दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी विधानपरिषद सभागृहाची बैठक होणार नाही. तसेच अधिवेशनाचा कालावधी हा सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ ते बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे.

**त्यामुळे संदर्भाधीन पत्रक भाग दोनमध्ये सुधारणा करण्यात येत असून त्यानुसार स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचनांचे बॅलटकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे दिवस निश्चित करण्यात आले आहेत.** सदर बॅलट विधान भवन, मुंबई येथील कार्यालयात श्री. मंगेश पिसाळ, अवर सचिव (समिती) यांचे **दालन क्रमांक ८०४ येथे सोमवार व बुधवार** व श्रीमती संगिता विधाते, अवर सचिव (समिती) यांचे **दालन क्रमांक १४०४-इ येथे मंगळवार व शुक्रवार** यादिवशी घेण्यात येईल. उक्त बॅलटचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आला असून त्यामध्ये बॅलटचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (१) मध्ये, अर्धा-तास चर्चेचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (२) मध्ये, बॅलटची वेळ विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व बॅलट घेणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहे.

| **बॅलटचा दिनांक (१)** | **अर्धा-तास चर्चेचा दिनांक (२)** | **वेळ (३)** | **अधिकाऱ्यांचे नाव (४)** |
|---|---|---|---|
| सोमवार, दि. ३ मार्च, २०२५ | मंगळवार, दि. ४ मार्च, २०२५ | सकाळी ११.०० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| मंगळवार, दि. ४ मार्च, २०२५ | बुधवार, दि. ५ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |
| बुधवार, दि. ५ मार्च, २०२५ | गुरुवार, दि. ६ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |

| | | | |
|---|---|---|---|
| सोमवार, दि. १० मार्च, २०२५ | मंगळवार, दि. ११ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| मंगळवार, दि. ११ मार्च, २०२५ | बुधवार, दि. १२ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |
| बुधवार, दि. १२ मार्च, २०२५ | सोमवार, दि. १७ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| सोमवार, दि. १७ मार्च, २०२५ | मंगळवार, दि. १८ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| मंगळवार, दि. १८ मार्च, २०२५ | बुधवार, दि. १९ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |
| बुधवार, दि. १९ मार्च, २०२५ | गुरुवार, दि. २० मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| शुक्रवार, दि. २१ मार्च, २०२५ | सोमवार, दि. २४ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |
| सोमवार, दि. २४ मार्च, २०२५ | मंगळवार, दि.२५ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्री.मंगेश पिसाळ अवर सचिव (समिती) |
| मंगळवार, दि. २५ मार्च, २०२५ | बुधवार, दि. २६ मार्च, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |

सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. याची कृपया नोंद घ्यावी.

**विधान भवन** **जितेंद्र भोळे,**
**मुंबई** **सचिव (१) (का.)**
**दिनांक : ११ मार्च, २०२५** **महाराष्ट्र विधानपरिषद**

याची प्रत :-

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (Website).
५. MKCL कक्ष.